सहपत्र - 1

नियोजित तारखा -

| अक्र | स्पर्धा तपशील / कृती | इंद्रधनुष्य तारखा |
|---|---|---|
| 01 | विभागीय युवक महोत्सव | 02 ऑक्टोबर 2017 पर्यंत |
| 02 | केंद्रीय महोत्सवासाठी मुख्यालयात माहिती पाठविणे | 05 ऑक्टोबर 2017 पर्यंत |
| 03 | विभागीय संघाचे मुख्यालयात आगमन | 27 ऑक्टोबर 2017 |
| 04 | केंद्रीय युवक महोत्सव (नाशिक मुख्यालयात) | 28 ऑक्टोबर 2017 |
| 05 | केंद्रीय सराव शिबीर (नाशिक मुख्यालयात) | 29 ऑक्टो.ते 2 नोव्हें 2017 |
| 06 | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | नोव्हेंबर 3, 2017 रोजी रात्री (विद्यार्थ्यांना घेऊन परभणी कृषी विद्यापीठात रवाना होणे.) |
| 07 | राज्यस्तरीय स्पर्धा (आंतरविद्यापीठीय) | नोव्हेंबर 4-9, 2016 |
| 08 | परतीचा प्रवास | नोव्हेंबर 10, 2016 |
| | | |

- युवक महोत्सवासाठी वयोमर्यादा ही 25 वर्षाची असल्याने विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनीचे वय 25 वर्षापेक्षा जास्त नसावे.
- केंद्रीय स्पर्धामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नाशिक येथे होणाऱ्या सराव शिबीरात सहभागी होणे बंधनकारक असेल. सराव शिबीरात सहभागी न होणाऱ्या स्पर्धकांना / कलावंताना आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवात सहभागी होता येणार नाही.
- सहभागी होणारे विद्यार्थी हे फक्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचेच विद्यार्थी असणे गरजेचे आहे. इतर विद्यापीठात प्रवेश असेल अशा विद्यार्थ्यांना या विद्यापीठामार्फत सहभाग घेता येणार नाही. इतर कोणत्याही विद्यापीठात प्रवेश नसल्याचे हमीपत्र प्रत्येक विद्यार्थ्यांकडून भरून घेणे बंधनकारक आहे. (सदर हमीपत्राची प्रत सोबत जोडली आहे.) इतर विद्यापीठात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना ह्या विद्यापीठामार्फत युवक महोत्सवात सहभागी होता येणार नाही, याची सर्व

विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यापूर्वी कल्पना देण्यात यावी. सदरचे विद्यार्थी अपात्र ठरविण्यात यावे.

- असे विद्यार्थी जर केंद्रीय युवक महोत्सवात भाग घेण्यासाठी आल्यास सदर विद्यार्थ्यांना येथे सहभाग घेवू दिला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.
- विभागीय केंद्राच्या संघासोबत फक्त विभागीय केंद्रावरील संघनायक म्हणून दोन व्यक्ती येतील. त्यात एक पुरुष संघव्यवस्थापक व एक महिला संघ व्यवस्थापक असतील. अभ्यास केंद्राची कोणतीही व्यक्ती विद्यार्थ्यांसोबत पाठवू नये. विभागीय केंद्रावरूनच संघ व्यवस्थापक (पुरुष व महिला) ह्यांची सविस्तर माहिती भरून पाठवणे अनिवार्य आहे. त्यावर विभागीय संचालकांची स्वाक्षरी व संमती असावी तरच त्या संघाची व्यवस्था विद्यापीठात करण्यात येईल.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. त्यात कुठलाही फेरफार करण्यात येणार नाही, याची सर्व संघांना माहिती देण्यात यावी. नंतर वाद घालू नये अशी समज सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावी असा वाद करणारा संघ स्पर्धेतून बाद करण्यात येईल याची देखील कल्पना विद्यार्थ्यांना आगोदरच देण्यात यावी.
- **युवक महोत्सवासाठी स्पर्धक संख्या ही फक्त 38 च आवश्यक असल्याने स्पर्धेसाठी लागणारे वादक किंवा साथीदार हे शक्यतो विद्यार्थ्यांमधीलच असावेत. त्याचप्रमाणे लागणारे वाद्यदेखील शक्यतो विद्यार्थ्यांकडे असणे आवश्यक आहे.** कारण विद्यापीठाकडे तशा प्रकारची सुविधा नसल्याने सदर व्यवस्था करणे विद्यापीठाला शक्य होत नाही. व संख्येचे बंधन असल्याने ते शक्य होत नाही. याची विद्यार्थ्यांना कल्पना देण्यात यावी.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

## प्रतिज्ञापत्र

मी ------------------------------------------------------------------------हया हमीपत्राद्वारे लिहून देतो / देते की, मी या विद्यापीठाची विद्यार्थी / विद्यार्थीनी असून, मी सन 2017-18 हया शैक्षणिक वर्षात मी फक्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचाच प्रवेशार्थी आहे. या विद्यापीठा व्यतिरिक्त माझा इतर कोणत्याही विद्यापीठात प्रवेश नाही.

मी सन 2017-18 या शैक्षणिक वर्षात इतर कोणत्याही विद्यापीठाकडून युवक महोत्सव किंवा क्रीडा महोत्सवासाठी सहभाग घेतलेला नाही. तसेच इतर कोणत्याही विद्यापीठाकडून आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला नाही.

वरील माहिती खरी आहे. जर सदर माहिती खोटी असल्यास त्यासंदर्भात होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार असेन. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या झालेल्या खर्चाची भरपाई माझ्याकडून करण्यात येईल याची मला जाणीव आहे. व ती भरपाई देण्यास मी तयार राहील.

अभ्यासकेंद्राचे नाव ---------------------------------------------------------------------------------

अभ्यासकेंद्राचा सही व शिक्का

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी